PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Tya Ratri Paus Hota
Year: 2009

Song: Asa Dwad Paus Aala
Lyricist: Gajendra Ahire

अस्सा दवाड पाऊस आला
झापे उडून गेलेली
अस्सा दवाड पाऊस आला
खोप उडून गेलेली
बाधामागं आडोशाची
झोप नागवी झालेली
अस्सा दवाड पाऊस आला
झापे उडून गेलेली
बाधामागं आडोशाची
झोप नागवी झाली
अस्सा घातला धिंगाणा
फांदी मोडली तोडली
भेदरल्या पाखरांचे
घरटे पाडले खाली
अस्से मारितो तडाखे
गाय कोंडली रानात
हंबर फूट ना देवा
दूध गोठले पाण्यात

अस्सा दवाड पाऊस आला
झापे उडून गेलेली
बाधामागं आडोशाची
झोप नागवी झालेली
अस्सा दवाड पाऊस आला
बुडवली त्यानं शेत
अस्सा झिम्माड खेळतो
बुडवली त्यानं शेत
एकटया बाभळीपाशी
गोळा झाली सारी भुतं
अस्सा कोसळे पाऊस
जन्मावर घाली घाव
तुझ्या कळस पाण्यात
राऊळी विठू धाव
अस्सा दवाड पाऊस आला
झापे उडून गेलेली
बाधामागं आडोशाची
झोप नागवी झालेली

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*